# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक : मवैअ-१०५८/प्र.क्र. २८१/(भाग-२) सेवा-३, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०४ जुलै, २०१९ अन्वये नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस. वैदयकीय अधिकारी, गट-अ, उपलब्ध होत नाहीत तो पर्यत बी.ए.एम.एस. अर्हताधारकांमधून त्या ठिकाणी नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस (M.B.B.S) अर्हताधारक वैदयकीय अधिकारी मिळेपर्यत केवळ ११ महिन्यासाठी यापैकी जे आगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेबाबत शासन आदेश आहेत. त्यानुसार नाशिक जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रा मधील रिक्त पदावर खालील नमुद केलेनुसार वैद्यकीय अधिकारी,गट-अ च्या तात्पुरत्या नेमणूका करण्यात येणार आहेत. त्यासाठी पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी<br>गट-अ | बीएएमएस | आदिवासी व दुर्गम भाग रु.४५,०००/-<br>इतर भाग रु.४०,०००/- |

नाशिक जिल्हयातील **प्राथमिक आरोग्य केंद्रे** येथील वैद्यकिय अधिकारी,गट-अ ची रिक्त पदसंख्या खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्राथमिक आरोग्य केंद्रे येथील वैदयकीय अधिकारी, गट-अ रिक्त पदे |
|---|---|
| १ | ०३ |

**निवड प्रक्रिया:-**

अ) बी.ए.एम.एस. च्या अंतिम वर्षी मिळालेले गुणांची एकत्रीत टक्केवारी (८० गुणापैकी)

ब) १० मार्कस अनुभवासाठी (अनुभव हा शासकीय / निमशासकीय / जिल्हा परिषद /नगरपालिका / महानगरपालिका अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचाच फक्त ग्राहय धरला जाईल. प्रतिवर्षासाठी २ गुण जास्तीत जास्त १० गुण अनुभवाचे प्रमाणपत्र
सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर करणे बंधन कारक राहील.

क) १० मार्कस बी.ए.एम.एस. नंतर पदव्युत्तर पदविका / पदवी धारकांना दिले जातील. महाराष्ट्र कौन्सील ऑफ इंडियन मेडीसीन यांचे नोंदणी आवश्यक.

ड) एकूण गुणांची गुणवता यादी तयार करणेत येईल त्यानंतर गुणवता यादीप्रमाणे रिक्त जागाचे दुप्पट प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीस बोलविणेत येईल. मुलाखतीसाठी निवड झालेल्या पात्र उमेदवारांची यादी **दि.१९/०८/२०१९** रोजी दुपारी ३:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, व जिल्हा परिषदेचे संकेत स्थळावर, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयांत जाहीर करण्यात येईल. अर्ज केलेल्या उमेदवारांनी आपले नाव मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवाराच्या यादीमध्ये समाविष्ठ आहे किंवा कसे यांची स्वतः शहानिशा करावी.

मुलाखती दिनांक २१.०८.२०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयांत घेणेत येतील. मुलाखतीचे वेळी मुळ प्रमाणपत्रांची छाणनी करणेत येईल समुपदेशाचे वेळी सर्व रिक्त जागाची ठिकाणे उमेदवारांना दाखविणेत येतील. व गुणवत्ता यादी नुसार रिक्त जागाप्रमाणे समुपदेशनव्दारे नियुक्ती निश्चित करणेत येतील. तोंडी मुलाखती साठी गुण दिले जाणार नाहीत.

त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैदयकीय व आरोग्य सेवा, गट-अ, या सवंर्गातील वैदयकीय अधिकारी, गट-अ या पदांवर एमबीबीएस उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे भरेपर्यंत कंत्राटी वैदयकीय अधिकारी म्हणून **बी.ए.एम.एस (BAMS)** अर्हताधारकांना नियुक्ती देण्याबाबतच्या कार्यवाही करणेकरीता तसेच सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी,गट-अ नेमणूकाबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देणेबाबत नमुना सोबत मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे. त्यांस मंजूरी मिळावी हि विनंती.

-: **अटी व शर्ती** :-

१) सदरची नियुक्ती नियमीत अथवा कंत्राटी एम.बी.बी.एस (M.B.B.S) अर्हताधारक वैदयकीय अधिकारी मिळेपर्यंत ११ महिने कालावधीसाठी भरण्यात येईल.

२) ज्या ठिकाणी एम.बी.बी.एस.वैद्यकिय अधिकारी कंत्राटी तत्वावर उपलब्ध होऊ शकत नाही अशा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे बीएएमएस अर्हताधारक उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दीतीने नियुक्ती देण्यात येईल. त्यांच्या जागेवर एमबीबीएस उमेदवार उपलब्ध झालेवर बीएएमएस पदवी अथवा बीएएमएस अर्हताधारक उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

३) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे शासकिय नियमित कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.

४) कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.

i) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर
ii) कामामध्ये निष्काळजीपणा
iii) बायोमेट्रिक प्रणालीवर हजेरी न लावणे
iv) कामकाज अकार्यक्षम असणे / सेवेची कर्तव्ये व जबाबदा-या कटाक्षाने न पाळल्यास
v) गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे
vi) कार्यरत पदावर नियमित वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ती झाल्यास

५) अर्ज करणा-या उमेदवारांचे वय सर्वसाधारण उमेदवारासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारासाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६) निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांनी नियुक्तीच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल. तसेच बायोमेट्रिक हजेरीप्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

७) निवड झालेले वैद्यकीय अधिकारी १ महिन्याची आगाऊ सूचना **जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** यांना देवून कार्यमुक्त होवू शकतील.

८) खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.

i) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकीय अधिकारी
ii) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकीय अधिकारी
iii) अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकीय अधिकारी

९) नियमित अथवा बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकीय अधिका-यांची सेवा समाप्त करताना जो वैद्यकीय अधिकारी त्या ठिकाणी शेवटी रुजू झालेला आहे त्याची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल व इतर ठिकाणी रिक्त पद असलेस त्या ठिकाणी नियुक्ती देणेबाबत प्राधान्य दिले जाईल.

१०) वैद्यकीय अधिका-यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार मागणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यांसाठी आंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र १००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे.

११) या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही

१२) शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्या अनुषगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

१३) वरिल पदासाठी अर्ज सोबतच्या नमुन्याप्रमाणे लिहून पासपोर्ट साईज फोटो चिकटवून सोबत शैक्षणिक अर्हता गुणपत्रिका व प्रमाणपत्रांसह (पदवी/पदवीका,पासिंग व अटेंम्ट), जातीचा दाखला व जात पडताळणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला (शाळा सोडल्याचा दाखला), महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल रजिस्ट्रेशन, एमएससीआयटी, इ. प्रमाणपत्राच्या

१४) साक्षांकित प्रती जोडुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१५) प्रस्तुत अटी व शर्ती मध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार समितीकडे राखीव राहतील.

१६) जाहिरात प्रसिध्द झालेपासून सोबतच्या नमुण्यातील अर्ज **दिनांक ०९.०८.२०१९** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत **सदस्य सचिव तथा जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे पोस्टाव्दारे मुदतीत पोहचतील अशा रितीने अथवा स्वतः सादर करावा.** पोस्टाव्दारे झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदस्य सचिव तथा
जिल्हा शल्य चिकीत्सक,नाशिक

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव<br>तथा<br>जिल्हा शल्य चिकित्सक<br>जिल्हा रुग्णालय, नाशिक | सदस्य<br>तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक | अध्यक्ष<br>तथा<br>जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक |

अर्जदाराचा
फोटो

# अर्जाचा नमुना

## कंत्राटी वैद्यकिय अधिकारी या पदासाठी अर्ज

प्रति,
मा.सदस्य सचिव तथा,
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय,नाशिक.

अर्जदाराचे संपुर्ण नाव - ..............................................................................

अर्जदाराचा संपुर्ण पत्ता - ..............................................................................

जन्मतारिख ...............................

भ्रमणध्वनी क्रमांक (संपर्कासाठी) - ........................................

अर्जदाराचा ई-मेल आय.डी.-...............................................

जात :- ............................ प्रवर्ग :- ........................................

शैक्षणिक अर्हता -

| अ.क्र. | पदवी / पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका | विदयापीठाचे नाव | वर्षनिहाय मिळालेल्या गुणांची टक्केवारी | नोंदणी क्र |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

अनुभव -

| अ.क्र | कार्यालयाचे नाव (शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, राष्ट्रीय आरोग्य अभियान) | पदाचे नाव | अनुभवाचा कालावधी (एकुण वर्ष) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी